# प्रकरण पाचवे
# उपसंहार

# प्रकरण पाचवे

## उपसंहार

ब्रिटीश राजवट भारतात सुरु झाल्यानंतर भारतात अनेक ठिकाणी प्रतिकात्मक चळवळी झाल्या, त्या सुशिक्षीत मध्यम वर्गापुरत्या मर्यादित होत्या. त्यात शेतकरी समाज आलेला नव्हता. यावेळी ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, थिऑसॉफिकल सोसायटीच्या रुपाने धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक चळवळी झाल्या परंतु त्याचे लोण ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचले नव्हते. यासुमारास महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील जनतेस आपलेसे करुन टाकणारी एक व्यक्ति होती ती म्हणजे 'महात्मा ज्योतीराव फुले' यांनी १८७३ साली **'सत्यशोधक समाजाची'** स्थापना करुन ब्राम्हणशाहीच्या विरुद्ध बंड पुकारले व हिंदुस्थानचा खरा प्रतिनिधी हा हिंदुस्थानातील शेतकरीच, हे लोकांना पटवून देण्यास सुरुवात केली.

शाहु महाराजांच्या काळातही ब्रिटीश यंत्रणा गरीब शेतकऱ्याला हरप्रकारे हैराण करत होती. ब्रिटीशांनी गरीबाच्या जमिनीपासून मिठापर्यंत सर्वांवर कर बसविले होते. म्हणूनच या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व आपले पुर्ण स्वातंत्र्य मिळविण्यासाठी 'भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा रणसंग्राम' हे कधीही न संपणारे पर्व सुरु झाले. ब्रिटीश सरकारला विरोध करण्यास सुरुवात केली. भारतीयांचे शोषण हाच या ब्रिटीशांच्या आर्थिक सत्तेचा पाया होता. त्यांनी भारत हा फक्त तयार वस्तु आयात करणारा देश बनविला होता. या अन्यायाला विरोध म्हणून अखेर भारतात जागृती होण्यास सुरुवात झाली. यातुनच १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली.

राष्ट्रीय सभेच्या स्थापनेमागे काँग्रेसने ब्रिटीश साम्राज्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने कार्य करावे हा एकमेव उद्देश ठेवला गेला. पुढे मवाळ युगात (१८८५-१९०५) ब्रिटीशाकडून हव्या असलेल्या सुधारणा ह्या राजकीय स्तरावरच समझोत्याच्या मार्गाने मागण्याचे धोरण अवलंबिले गेले. त्यांना भारतात प्रथम सामाजिक, राजकिय, आर्थिक, औद्योगिक व शैक्षणिक सुधारणा आवश्यक होत्या. यावेळीही पुर्ण स्वातंत्र्याची मागणी मागेच पडली. जहाल युगात (१९०५ ते १९२०) मध्ये मात्र राष्ट्रीय चळवळीचा संदेश भारतातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न सुरु झाले. १८८५ ते १९२०पर्यंतची स्वातंत्र्य चळवळीची साताऱ्याची कामगिरी फार महत्त्वपूर्ण ठरली. गांधी युगात (१९२०नंतर) या स्वातंत्र्य चळवळीला नवी दिशा मिळाली .

गांधीजींनी असहकार, सविनय कायदेभंग व चलेजाव चळवळ या त्रिसुत्री कार्यक्रमाव्दारे ही राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविली. यात त्यांनी सत्त्याचा, बहिष्काराचा व अहिंसेचा मार्ग स्विकारला. १९२२ मध्ये चौरीचौरा प्रकरणानंतर असहकार चळवळीने हिंसक वळण प्राप्त केल्याने ही चळवळ गांधीजींनी मध्येच बंद केली. १९३० मध्ये मात्र गांधीनी सविनयाने ब्रिटीश कायदे मोडण्यास सुरुवात केली. या चळवळीच्या माध्यमातून भारतीय स्वातंत्र्य चळवळीला **'लोकचळवळीचे'** स्वरुप प्राप्त झाले. गांधीनी वृद्ध-तरुण, श्रीमंत-गरीब, वृद्ध स्त्रिया अशा सर्व स्तरातील लोकांना काँगेसच्या झेंड्याखाली एकत्र आणण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांच्या मदतीनेच गांधीजींनी ६ एप्रिल दांडी येथे मिठाचा कायदा मोडला. मात्र पावसाच्या आगमनामुळे या मीठ मोहिमेला स्थगिती मिळाली. पुढे ही चळवळ जंगल सत्याग्रहाच्या माध्यमातून चालु ठेवण्याचे ठरले.

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत 'शेती' हा भारतीयांचा मुख्य व्यवसाय आहे. त्यामुळे जमीन, जनावर व जंगल हे तीन 'जकार' त्यांच्या जीवनाशी निगडीत अशा होत्या. परंतु ब्रिटीश सरकारने जमीनीवरील साऱ्याबरोबरच जंगल विषयकही कडक असे कायदे केले. ज्या कायद्यात जळणासाठी लाकूड तोडण्यास व जनावरांना चरण्यास बंदी होती. काही शेतकरी आदिवासी या जंगल संपत्तीवर आपला उदरनिर्वाह करत होते. म्हणूनच पावसाळ्याच्या सुरुवातीलाच जंगल भागातील लोकांनी जंगल कायदे मोडण्यास सुरुवात केली.

महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर या जंगल सत्याग्रहांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. याला कारणीभूत ब्रिटीशांचे कडक असे जंगल कायदेच होते. ब्रिटीशांनी अतिशय धुर्त रितीने जी झाडे त्यांना आर्थिक लाभ मिळवून देतात, फक्त त्याच झाडांना बंदी भागातील झाडे म्हणून घोषीत केले होते. यात साग, शिसव, चंदन या झाडांचा प्रामुख्याने उल्लेख करण्यात आला.[१] कारण ही झाडे इमारती बांधकामासाठी फार उपयुक्त अशी होती. त्यामुळे त्यांची बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात मागणी होती. यातुन मिळाणारा आर्थिक लाभही फक्त ब्रिटीशांच्या तिजोरीत पडणार होता. त्यामुळे त्या झाडांची साधी फांदी देखील तोडण्याला कठोर अशी शिक्षा होती. लोकांसमोर मात्र पर्यावरण संतुलनाचा आव ब्रिटीश आणत होते. जेणेकरुन लोकांना हा आपल्यावर होणारा अन्याय वाटू नये, जंगलातून मिळणारे मध, वनऔषधी, फळे- करवंदे, जांभुळ, आवळा हे विकून आदिवासी शेतकरी आपला उदरनिर्वाह करत. या फळझाडांना बाजारपेठेतही मागणी होती. म्हणूनच सरकारने हे उत्पन्न ज्या ठराविक भागात मिळत होते तो भागच बंदी भाग म्हणून घोषीत केला. हे सारेच शतकानुशतके निसर्गदत्त संपत्ती म्हणून जंगलातील लोक व शेतकरी वापरत असत.

शेतकरी जीवनाची तिसरी आवश्यक गोष्ट म्हणजे जनावर. ज्या जनावरांच्या दुधावर कितीतरी कुटूंबे अवलंबून होती. दुध हा एकमेव सकस आहारातील भाग होता. जंगलातील गवत चरणाऱ्या जनावरांपासून उत्पन्न मिळत होते. परंतु ब्रिटीशांनी मात्र या गुरांना चारा मिळणेच बंद केले. जंगली भागातील गवत कापण्यास बंदी आणली. गायरान म्हणून जो जंगली भाग खुला ठेवला जाई तेथे गुरे चराईस बंदी आणून देखील जो कोणी याविरुद्ध जाईल त्यास पैशाच्या स्वरुपात दंड आकारण्यात आला. तसेच जी गुरे या राखीव भागात चरताना दिसतील त्यांना कोंडवाड्यात टाकण्याचे प्रमाण वाढले. मुक्या जनावरांनाही त्यांनी शिक्षेपासून मुक्तता दिली नाही. १९२० ते १९२९ पर्यंत गुरे चराईच्या वार्षिक उत्पन्नात वाढ होत गेली. यावरुन असे स्पष्ट झाले की, गुरे चराई फी दुप्पट झाली, गवताची गंडी चौपट वाढली, गवताची परंड दुप्पट-चौपट वाढली, अंजनाचा पाला दुप्पट झाला, सरपण, टहाळ, काटेरी, बांबु यांच्या दरातही दुप्पटीने वाढ झाली.[२] थोडक्यात काय तर जंगल कायदे करण्यापाठीमागे ब्रिटीशांचा फक्त आर्थिक दृष्टीकोनच होता. याव्दारे त्यांनी गरीब जनतेकडून कर उकळून आपल्या तिजोरीत भरच टाकली.

या अन्यायाविरुद्ध शेतकऱ्यांनी आपल्या तक्रारी नोंदविल्या. या तक्रारीव्दारे काही सुधारणांची मागणी केली. परंतु सरकारवर याचा काहीही फरक पडला नाही. निव्वळ एकट्या मुंबई सरकारच्या जंगलाच्या वार्षिक उत्पन्नात झालेल्या तीस लाखाच्या घटीमुळे, ती घट भरुन काढण्याच्या हेतुखातर सरकारने जंगल कायदे केले असे त्यांनी दाखवून दिले, खरे म्हणजे जंगलातून होणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज त्यांना इथेच आला होता. यामुळे शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे त्यांनी दुर्लक्ष केले. या तक्रारीची चौकशी करण्यासाठी मुंबई कौन्सिलने १९२५ मध्ये एक समिती नेमली होती.[३] परंतु या समितीच्या रिपोर्टचा काही उपयोग झाला नाही.

कारण ब्रिटीश जंगल कायद्याचे शेतकरी जीवनावर फार गंभीर परिणाम झाले होते. तसेच चारा मुबलक न मिळाल्यामुळे त्यांची गुरे दुर्बल झाली. कोंडवाड्याच्या खटल्यात झालेल्या दंडाबद्दल शेतकऱ्यांचे पैसे गेले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कर्जात भर पडली. बंदी भागात गेल्यामुळे कितीतरी जमीन नापीक बनली आणि म्हणून या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी या गरीब शेतकरी वर्गाने गांधीजींच्या कायदेभंग चळवळीला पांठींबा देवून आपल्या गावोगावी प्रतिकात्मक असे जंगल सत्याग्रह घडवून आणले.

महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेश मध्ये जिथे समुद्र किनारा नाही पण जंगलसंपत्ती आहे तिथे जंगल सत्याग्रह घडवून सरकार विरोधाचे सत्र सुरु झाले. महाराष्ट्रातील संगमनेर, नाशिक,खानदेश, पुणे, ठाणे, कुलाबा, चिरनेर व बिळाशी इ. ठिकाणी 'महाराष्ट्र कायदेभंग समितीच्या' आदेशाप्रमाणे जंगल सत्याग्रह झाले. साताऱ्यात याचे पडसाद तीव्र उमटले. यात रेठरे धरण, कामेरी, तांबवे, पेठ, प्रचितगड, बेलमाची, मायणी, मसूर, इस्लामपूर, विटा व बिळाशी इ.चा उल्लेख करावा लागतो. सातारा जिल्ह्यात ही जागृती करण्यात सत्यशोधक चळवळीचा फार मोठा पुढाकार होता. या चळवळीने 'जलशांच्या' माध्यमातून गरीब शेतकरी जनतेत शिक्षणाचा प्रसार केला व त्यांना त्यांच्यावर ब्रिटीशांकडून होणाऱ्या अन्यायाची जाणीव करुन दिली. यातुनच सातारा जिल्ह्यातील शिराळा पेठ्यातील 'बिळाशी' सारख्या दुर्गम खेड्यात १९३० ला हा जंगल सत्याग्रह झाला.

बिळाशी जंगल सत्याग्रह यशस्वी होण्यास जेवढी साताराची ऐतिहासिक पार्श्वभूमी प्रेरणादायी ठरली तेवढीच तेथील भौगोलिक परिस्थिती महत्त्वपूर्ण ठरली. शिराळा पेठ्यातील सागवानी झाडासाठी प्रसिद्ध गाव म्हणून बिळाशी ओळखले जात होते. शिराळापासून बिळाशीस जाण्यास पश्चिमेकडून एक

गाडी रस्ता होता. तोही इतका खराब की एक तासाच्या प्रवासाला चौपट वेळ लागे. बिळाशीच्या पुर्वेला व उत्तरेला दाट जंगल, दक्षिणेला वारणा नदी ओलांडली की पंतांच्या मलकापूर हद्दीत प्रवेश होई. त्यावेळ मलकापूर हे कोल्हापूर संस्थानात मोडत होते. त्यामुळे तेथे ब्रिटीश कायदा चालत नव्हता. या संस्थानाचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील आंदोलन कर्त्यांना पाठिंबा होता. बिळाशीच्या पुढे पश्चिमेकडे आरळ्यापर्यंत व उत्तरेकडे कराड तालुक्यात फक्त पायवाट किंवा घोड्याचा वापर केला जाईल. जंगलातील जनावरांपासून संरक्षण करत, प्रवास करत. तसेच हा भाग जास्त पावसाच्या प्रदेशात मोडतो. येथे मे मध्ये पावसास सुरुवात होई. ते ऑक्टोबरपर्यंत धो-धो पाऊस पडे. तो अशा प्रकारचा असे की, आठ-आठ दिवस येथील माणूस घराच्या बाहेर पडत नसे. या जंगलसत्याग्रहाच्या वेळीही हीच स्थिती होती. जुलै ते सप्टेंबर याच कालावधीत झाला त्यामुळे येथील पावसाचे अनुभव ब्रिटीश पोलिसांनी घेतले. या परिस्थितीमुळे सहजासहजी या भागात प्रवेश करुन येथील सत्याग्रह मोडण्याचा प्रयत्न ब्रिटीश करु शकले नाहीत. यातुन स्वंयसेवकांची धुर्त निती स्पष्ट होते. ज्याच्या आधारावर बिळाशीचा भौगोलिक अभ्यास करुन बरोबर त्याच कालावधीत त्यांनी बिळाशीत हा सत्याग्रह घडवून आणून ब्रिटीश पोलिसांना हैराण करुन सोडले. हा लढा १८ जुलै १९३० ते ५ सप्टेंबर १९३० असा सलग पन्नास दिवस चालू राहिला. येथील शेतकऱ्यांनी नैसर्गिक परिस्थितीचा वापर करुन ब्रिटीशांना हैराण करण्याचे धोरण अवलंबिले.

या बरोबरच याला कारणीभूत येथील लोकांचा कणखरपणाही होता. त्यांच्या अंगातील धाडसी, निर्भय वृत्तीमुळेच हा लढा ते देवू शकले. १८ जुलै ५ सप्टे. १९३० या कालावधीत अहोरात्र येथील स्त्री-पुरुष, मुले, म्हातारी माणसे हाताची कडी करुन बिळाशी सलग ५० दिवस फडकत असलेल्या तिरंग्याला संरक्षण

दिले. याला बिळाशीच्या आजुबाजूच्या गावांचाही पाठिंबा होता. महाराष्ट्राबाहेरील जंगल सत्याग्रहाची तुलना करता हा सत्याग्रह महत्त्वपूर्ण असा आहे. कारण आंध्र, कर्नाटक, मध्य प्रदेशमध्ये जे सत्याग्रह झाले त्याचे स्वरुप हिंसकअसे होते.[४] मात्र बिळाशीतील सत्याग्रह पूर्णरित्या अंहिसक होता.

याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे या काळात जो कोणी ब्रिटीश अधिकारी त्यांना सुनावण्यासाठी व सागवानी सोट ताब्यात घेण्यासाठी बिळाशीत येत असे त्याला त्यांनी जेवण-पाणी व त्यांच्या घोड्याला वैरणही मिळू दिली नाही. म्हणजेच ब्रिटीश अधिकाऱ्यांबरोबर असहकाराच्या धोरणाचा वापर केला. तसेच जो पोलिस पाटील बिळाशीच्या बातम्या सरकारपर्यंत पोहचवी, त्याच्यावरही बहिष्कार टाकण्यात आला. त्यांच्या या एकजुटीतून त्याच्या मनातील ब्रिटीश शासनाची पोलिसांविषयीची भिती कमी झाल्याची दिसून येते. जे सत्याग्रही अहोरात्र झेंड्याच्या संरक्षणार्थ थांबत, त्यांच्या जेवणासाठी गावभर हिंडून भाकरी व भाजी मागून आणण्याचे काम गावातील लहान मुले करत. यातून ब्रिटीशांना आपण विरोध करीत आहोत हे लहान मुलांच्या मनावर बिंबवले गेले होते. या झेंड्याच्या संरक्षणार्थ जी कडी करण्यात येत होती, त्यामध्ये मुक्ताबाई साठे, मैनाबाई धनगर, धोंडुबाई मस्कर, राजुबाई कदम पाटील या धीट बायकांची महत्वपूर्ण अशी कामगिरी होती. जे कडे तोडण्यास ब्रिटीशांना फार अवघड गेले त्यामुळे पुढील आंदोलनास स्त्री म्हणून शिक्षा नाही हा मार्ग ब्रिटीशांनी बंद केला. बिळाशीसारख्या परंपरावादी खेड्यात स्त्रियांनी घराबाहेर पडून काहीतरी करावे, आंदोलनात भाग घ्यावा ही स्त्री स्वातंत्र्याची नांदी होती. रुढी-बंधनांना आव्हान देणारी घटना होती. यातील बलुतेदार स्त्रियांचा सहभाग फार महत्त्वपूर्ण आहे. ज्या काळात स्त्रियांची कामगिरी चुल आणि मूल यापुरती मर्यादित होती. त्या काळात या लढाईच्या माध्यमातून

प्रथमत: ग्रामीण स्तरावरील स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत उतरल्या. सबार्ल्टन दृष्टीकोनातून हा महत्त्वपूर्ण असा सहभाग ठरला. यावरुन असे स्पष्ट होते की, गांधीजींचे तत्वज्ञान तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचले होते. तसेच गावातील बारा बलुतेदार व गावचे पाटील, ब्राम्हण या सर्वांचा स्त्रियांसह असलेला यातील सहभागावरुन असे स्पष्ट होते की, १९३० साली बिळाशी भागात जाती भेदाचा पगडा कमी झाल्याचे जाणवते. म्हणून सर्व जातीचे लोक देवळात एकत्र रहात, एकत्र खात तसेच महार,मांग, चांभार यांना रामेश्वराच्या मंदिरातही प्रवेश होता. यावरुन हे स्पष्ट होते की येथे जातीभेद पाळण्याचे प्रमाण कमी झाले होते. ही सर्व साताऱ्यातील सत्यशोधक समाजाच्या कार्याची जागृती होती.

या सत्याग्रहाचे पडसाद सर्व जिल्हाभर पडले. याचे स्वरुप गवत कापणी सत्याग्रहात बदलले. ही याच सत्याग्रहाची प्रेरणा होती. म्हणूनच ब्रिटीशांनी या सत्याग्रहाला दडपण्यासाठी सातारहून सरकारी कुमक मागविली.[५] तसे पाहता बिळाशीचा हा लढा अहिंसक मार्गाने होता. हे आपणास ब्रिटीश अधिकारी इन्स्पेक्टर बंकटसिंग, इन्स्पेक्टर नाईक यांच्या उलट तपासणी जबाबातून दिसते.[६] बिळाशीतील घटनेत हिंसक वळणही सरकारने बिळाशीतील लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याच्या हेतूनेच दिले. मांगरुळच्या दोन कोवळ्या मुलांच्यावर केलेल्या गोळीबारानंतर ते त्यांचा जीव वाचवू शकत होते परंतु ते त्यांनी केले नाही. येथे काही प्रमाणात काँग्रेस कमिटीला जबाबदार धरावे लागते कारण त्यांच्या सांगण्यावरुन हा उठाव झाला होता. परंतु येथील जनतेस तत्पर असा पाठिंबा त्यांनी दिला नाही.

तत्कालीन भारतीय वृत्तपत्रांनी बिळाशी सत्याग्रहातील ब्रिटीशांनी केलेल्या अत्याचाराची नोंद घेवून हा प्रकार फार घृणास्पद आहे, यातून ब्रिटीश राजवट किती क्रूर आहे हे लोकांना सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु बरोबर याच्या

उलट तत्कालीन ब्रिटीश वृत्तपत्रांनी, अधिकाऱ्यांनी बिळाशीतील या घटनेला 'बंड', 'देवतांचे संरक्षणार्थ', ब्रिटीशांना केलेला विरोध अशा स्वरुपात या भागाचा लोकसंपर्क तोडला. जेणे करुन या घटनेची सत्यता बाहेरील लोकांपर्यंत पोहचू नये. ज्या टाइम्स वृत्तपत्राने बिळाशीचा उल्लेख बंड म्हणून करुन त्या घटनेला विकृत असे स्वरुप देण्याचा प्रयत्न चालविला होता. मात्र ब्रिटीश इन्स्पेक्टर नाईक याच्या जबानीवरुन हे स्पष्ट होते की, या वृत्तपत्राचा वार्ताहर प्रत्यक्ष त्याठिकाणी हजर नव्हता हे केसरीमधील १ नोव्हें. १९३० च्या इन्स्पेक्टर नाईक यांच्या उलट तपासणी जबाबातून स्पष्ट होते. तो म्हणतो, 'टाईम्सने काय माहितीवरुन बंड असे लिहिले ते मला माहित नाही, गोळीबार होईपर्यंत टाईम्सचा बातमीदार मला दिसला नाही.'[७] यावरुन या टाईम्स वृत्तपत्राची असत्यता आपल्या लक्षात येते. बिळाशी जंगल सत्याग्रहात फक्त जंगलातील सागवानी सोट आणून गावात उभारला नाही तर यावरती सलग पन्नास दिवस भारतीय ध्वज फडकवत ठेवला. यावरुन बिळाशी जंगल सत्याग्रहाचा उल्लेख 'झेंडा सत्याग्रह' म्हणूनही करणे योग्य ठरते.

बिळाशी जंगल सत्याग्रहातील सत्याग्रहींना दादासाहेब करंदीकरांच्या युक्तीवादामुळे व इन्स्पेक्टर नाईक, इन्स्पेक्टर बंकटसिंग यांच्या जबावामुळे या सत्याग्रहींवर गर्दी करुन दंगा केल्याच्या, सरकारी अधिकाऱ्यांच्या कामात अडथळा आणण्याच्या व चोरीचा माल विकत घेतल्याच्या आरोपाखातर त्यांना सौम्य स्वरुपाच्या शिक्षा झाल्या, हे १ नोव्हे. १९३० च्या केसरीमधील बातमीवरुन समजते.[८] पुढे १९४२ च्या लढ्यात यासत्याग्रहींची कामगिरी उल्लेखनीय अशी ठरली. या बिळाशी सत्याग्रहातून मिळालेल्या आत्मविश्वासामुळे **'शिराळा पेठ्यात प्रतिसरकारची'** स्थापन झाली.

थोडक्यात बिळाशी जंगल सत्याग्रह यशस्वी होण्यास तेथील सत्यशोधक समाजाने केलेली जागृती महत्वाची आहे. त्याचप्रमाणात बिळाशीची भौगोलिक स्थितीही महत्त्वपूर्ण ठरते. जंगली असा परिसर, भरपूर पावसाचा प्रदेश, रस्त्यांची सोय नाही, लोकांच्या अंगातील कणखर वृत्ती, देशासाठी प्राण पणाला लावणारे लोक तेथे होते. या सत्याग्रहातील स्वंयसेवकांच्या हुशारीने केलेले सत्याग्रहाचे नियोजन विशेष महत्त्वपूर्ण आहे. शिवकाळापासून स्वातंत्र्यात जगलेले लोक सातारच्या विलीनीकरणानंतर (१८४८) मध्ये बिथरले होते. १८५८ मध्ये त्यांनी उठावात भाग घेतला होता. याला १८५७ च्या बंडाची प्रतापसिंहाच्या संघर्षाची पार्श्वभूमी महत्त्वपूर्ण ठरते. पण गांधींच्या नेतृत्त्वाखाली सामान्य जनतेने बंडाची रचना करुन ती यशस्वी करुन दाखविली. त्यामुळेच यशवंतराव चव्हाण यांनी १९३० मध्ये बिळाशी येथे जावून येथील लोकांचे कौतुक करुन त्यांना काँग्रेसचा पांठिबा दर्शविला.[९] तसेच सातार्‍याचा इतिहास ही या घटनेला कारणीभूत ठरतो. ज्यातून प्रेरणा घेवून बिळाशीतील लोक ब्रिटीशांना विरोध करु लागले.

ब्रिटीशांनी जंगल कायदे जेथे मोठ्या प्रमाणात जंगल होते अशाच भागवर केले होते. कारण याभागातून मिळणारा शेतसारा फार कमी प्रमाणात होता. कारण जास्त जमीन जंगलाने व्यापल्याने मिळणार्‍या पिकाचे उत्पन्न कमी म्हणून हा समतोल साधण्यासाठी त्यांनी जंगलविषयक कायदे केले. ज्यातून शेतसारापेक्षाही अधिक उत्पन्न ब्रिटीश सरकारला मिळू लागले. म्हणूनच या अन्यायाला विरोध म्हणून झालेल्या बिळाशी सत्याग्रहात बहुजनांचा सहभाग होता. मंदिरातील बहुजनांच्या प्रवेशावरुन हे जाणवते की तेथे जातीभेदाची तीव्रता कमी होती. या लढ्याच्या माध्यमातून पहिल्यांदा ग्रामीण स्तरावरील स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत उतरल्या. यातुन प्रेरणा घेवूनच १९४२ च्या लढ्यात शिराळा पेठ्यातील कमळाबाई शेडगे,

सुलोचनाबाई जोशी यांनी मोलाची कामगिरी केली. या लढ्याला कोणतेही राष्ट्रीय किंवा प्रादेशिक स्तरावरील नेतृत्त्व नव्हते. सामान्य गरीब शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठीच दिलेल्या या लढ्याला गरीब अशिक्षीत शेतकऱ्यांचेच नेतृत्त्व होते. हा सत्याग्रह पुर्णत: अंहिसात्मक मार्गाने झाला. महाराष्ट्राबाहेरील म्हणजेच आंध्र, कर्नाटक, मध्य प्रदेश मधील जंगल सत्याग्रहाचे लढे हिंसात्मक मार्गाने होते. यावरुन असे स्पष्ट होते की बिळाशीतील लोकांवर गांधीजींच्या अंहिसा व बहिष्कार तत्वज्ञानाचा गाढा परिणाम झाला होता. गांधीजींचे तत्वज्ञान ग्रामीण स्तरापर्यंत पोहोचले होते हे स्पष्ट होते.

तत्कालीन भारतीय केसरी, मराठा, राष्ट्रवीर ही वृत्तपत्रे ब्रिटीश राजवट किती क्रूर आहे हे स्पष्ट करत होती. मात्र लंडन टाईम्स हे ब्रिटीश वृत्तपत्र फसवणुकीचा प्रकार दर्शवून बिळाशीतील लोकांना अंधश्रद्धाळू, गांवढळ म्हणून त्यांना हिनवत होती. खरे पाहता सर्व परिस्थितीचा अभ्यास केल्यानंतर हे स्पष्ट होते की, ब्रिटीश राजवटीचे स्वरुप हिंसक व क्रूर होते. त्यांची राजवट अत्याचारी होती. बिळाशीतील लोकांवर दडपशाही निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पण त्यांच्या बाजूच्या वृत्तपत्राने तो झाकण्याचाही प्रयत्न केला.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील चले जाव आंदोलनाच्या वेळी (१९४२) या भागातील भूमिगत दिवसा ढवळ्या उघडउघड आपल्या कारवाया करत. या काळात सातारच्या प्रतिसरकारचे उगमस्थान म्हणून **'शिराळा पेठा'** नावारुपाला आला कारण हा शिराळा पेठा आपल्या इतिहासामुळे, बिळाशी सत्याग्रहात सत्याग्रहींनी मिळविलेल्या विश्वासामुळे व या भागातील निडर लोकांमुळे भूमिगतांचे आश्रयस्थान बनला होता. आज ही या भागात बिळाशी जंगल सत्याग्रहातील सत्याग्रहींना मानाचे असे स्थान आहे. थोडक्यात १९४२ च्या लढ्यातील शिराळा

पेठ्यातील आंदोलनाचा पाया याच बिळाशी जंगल सत्याग्रहाने घातला. ज्या काळात संपूर्ण भारत हा ब्रिटीश अंमलाखाली होता त्यावेळी बिळाशीतील लोकांनी मात्र पन्नास दिवस स्वातंत्र्य उपभोगले. या सर्वांमुळे आज ही या **'बिळाशी झेंडा सत्याग्रहाला'** भारतीय इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान आहे.

## संदर्भ

१) राजमाचिकर न.त्री., 'सटिक हिंदुस्थानचा जंगलाबाबत ॲक्ट-सन १९२८ चा ॲक्ट १६ वा', न्यायाश्रय, पुणे, १९२९, पृष्ठ क्र.१२२.

२) सार संग्रह अर्थात केसरी छोटे फाईल, १९३०, जंगल कायद्याविरुद्ध शेतकऱ्यांच्या तक्रारी, लेखांक पहिला, ७ जून १९३०, केसरी मराठा ट्रस्ट, नारायण पेठ, पुणे, पृष्ठ क्र. ३३६.

३) केसरी २५ ऑक्टो. १९३०.

४) सरकार सुमित, 'आधुनिक भारत', (१८८५-१९४७) अनुवाद सुशिला डोभाल, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, पटना, २००३. पृष्ठ क्र. ३१९.

५) Chaudhari K.K. (Ed.): Civil Disobedience movement April-September, 1930, Vol XI, Page No. 855U

६) केसरी, १ नोव्हें. १९३०.

७) कित्ता.

८) कित्ता.

९) चव्हाण यशवंतराव, 'कृष्णाकांठ' , प्रेस्टीज प्रकाशन, पुणे १९८४, पृष्ठ क्र. ७८.